The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# मराठीतील संताच्या साहित्यप्रकाराचा वाङ्•मयीन अभ्यास

**प्रा.डॉ. शिवाजी परळे**
(मराठी विभाग)
संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी. जि. परभणी.

**प्रस्तावना -**

यादवकालापासून प्रवाहित झालेले मराठी संतसाहित्य असे धर्म, तत्त्वज्ञान व अध्यात्म यांचे समर्थ संदर्भ घेऊन येते. वैदिक धर्माची चौकट अबाधित ठेवून आणि तत्त्वज्ञान हा आत्मानुभवाचा विषय बनवून ज्ञानेश्वरांनी अध्यात्मसाधनेचा, संतत्वाचा व नैतिकतेचा जो श्रेष्ठ आदर्श उत्तरकालीन संतापुढे ठेवला, त्यास अनुसरूनच पुढील संतांनी वाटचाल केलेली दिसते. गीतेवर भाष्य करताना संत ज्ञानेश्वरांनी ज्याप्रमाणे स्वतःच्या आत्मानुभूतींची साक्ष महत्त्वाची मानली त्यामुळे ज्ञानेश्वरीकडून प्रेरणा घेऊनही सर्व संत आपापल्या प्रकृतीनुसार संतत्वाचा शोध घेत स्वानुभवनिष्ठ साहित्यनिर्मिती करू शकते. परिणामी, मराठी संतसाहित्यास प्रकृतीभिन्न आध्यात्मिक अनुभव विश्वाची जोड मिळून ते समृद्ध झाले. शिवाय संतत्वाची विविध परिमाणेही त्यास लाभून ते संपन्न बनले.

मराठी संतसाहित्यात संत नामदेवांची सगुणभक्ती, संत एकनाथांची अद्वैतवादी भूमिका व संत तुकारामांची जीवननिष्ठा अशी आध्यात्मिकता सुखनेव प्रकट होऊ शकली. याचे कारण त्यातील लवचिकता होय. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीरुपाने आध्यात्मिक अनुभवाचा आदर्शच संतापुढे ठेवला. ज्ञानेश्वरांनी गीताभाष्यात जे स्वातंत्र्य अनुभविले, तेच अन्य संतांनी अनुभविलेले दिसते. परिणामी, संतसाहित्यात आत्मानुभवांची प्रतिष्ठा वाढली. ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंतचे सर्व संत आध्यात्मिक जीवनात, स्वानुभवांना आत्यंतिक महत्त्व देताना दिसतात. त्यामुळे संतसाहित्यात चैतन्यपूर्ण आत्मानुभवांची सतत भर पडत गेली व ते अखंड सतेज व टवटवीत राहिले.

ज्ञानेश्वरीच्या अभावी मराठी संतसाहित्याची संकल्पनाच उभी राहू शकत नाही. ज्ञानेश्वर नसते तर नामदेवांची सगुणभक्ती निर्गुणाकडे झुकली नसती. संत एकनाथांना भागवतावर भाष्यग्रंथ रचण्याची प्रेरणा लाभली नसती. यादवकाळातील संतांची 'मांदियाळी' दिसली नसती. तुकारामांना श्रेष्ठ गीताधर्म आपल्या जीवनातून व साहित्यातून प्रवाहित करता आला नसता. महाराष्ट्राचा अभ्युदय साधनारी वारकरी पंथाची चळवळ उभी राहू शकली नसती व तिच्या आश्रयाने सहा सात शतकांना व्यापून उरणारी संतसाहित्याची परंपराही जन्मास आली नसती. कारण सर्व संतांचे परस्परांशी आध्यात्मिक नाते असले, तरी प्रत्येक संतांचे ज्ञानेश्वरीशी थेट पहिले नाते आहे.

**१. भाष्यकाव्य :**

समग्र संतकाव्यात भाष्यात्मक काव्यग्रंथांना विशेष प्रतिष्ठा असून ते संतसाहित्यात पायाभूत मानले जातात. तेराव्या शतकातील 'ज्ञानेश्वरी' व पंधराव्या शतकातील 'एकनाथी भागवत' हे दोन प्रमुख भाष्यकाव्यग्रंथ होत. 'एकनाथी भागवता'च्या तुलनेने 'ज्ञानेश्वरी' या भाष्यकाव्याचा अधिक अभ्यास झाला असून त्यात धार्मिक दृष्टिकोन, तात्विक दृष्टिकोन इत्यादी दृष्टिकोणांना आत्तापर्यंत

विशेष प्राधान्य लाभलेले दिसते. 'ज्ञानेश्वरी' सारखा जिवंत ग्रंथ भाष्यग्रंथ असला तरी त्यास अनेकविध परिमाणे लाभत असल्याने त्याचा विविध मानवजीवीय शास्त्रीय दृष्टिकोणांतून अभ्यास होणे अटलच नव्हे तर आवश्यकही ठरते. मूळ गीताच जीवनसन्मुखतेने प्रकट झाली असून, ज्ञानेश्वरीत ती शतमुखांनी जीवनाला सामोरी जाते.

तथापि, 'ज्ञानेश्वरी' हा एक श्रेष्ठ काव्यग्रंथ आहे. त्यात ज्ञानेश्वराची भूमिका भाष्यकाराची असूनही ज्ञानेश्वरीमागील प्रमुख प्रेरणा काव्यनिर्मितीची आहे. भाष्य व काव्य ज्ञानेश्वरीत एकात्म व एकसंध झाले आहे म्हणूनच ज्ञानेश्वरीतील भाष्य त्यातील काव्याहून वा काव्यभाष्याहून वेगळी काढता येत नाही. ज्ञानेश्वरीसारखा काव्यात्मकतेत श्रेष्ठतेची पातळी गाठणारा अथवा तिच्या जवळपास जाऊ शकणारा अन्य ग्रंथ संतसाहित्यातच नव्हे तर समग्र मराठी साहित्यातही दिसत नाही.

ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांचे कविमन एवढे सुकोमल व संवेदनशील आहे की, तत्त्वविचार हा त्यांच्यापुढे तत्त्वानुभवाचे रूप घेऊन येतो. योगाचे योगानुभवात रूपांतर होते आणि संतत्व कवित्वाच्या हातात हात गुंफून चालू लागते. ज्ञानेश्वरांची प्रतिभा सतेज, तारुण्यसुलभ, संवेदनशीलतेने प्रस्फुरित होणारी, सौंदर्यलक्ष्मी व अनुभवानुसारी असल्यानेच एका अखंड तत्त्वज्ञानावरील त्यांचे भाष्य एक श्रेष्ठ काव्यग्रंथ म्हणून अवतरते. केवळ मराठी अथवा भारतीयच नव्हे तर जागतिक साहित्यातील एक चमत्कार म्हणजे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ होय.

**२. आत्मचिंतनपर स्वतंत्र काव्यग्रंथ :**

'अमृतानुभव' हा ज्ञानेश्वरांचा स्वतंत्र काव्यग्रंथ असून, तो आत्मसंवादाच्या भूमिकेतून आत्मानुभवांच्या अभिव्यक्तीसाठी रचला गेला आहे. 'ज्ञानेश्वरी' तून भाष्याच्या अनुषंगाने व्यक्त होणारी अवधी सौंदर्यसृष्टी 'अमृतानुभवा'तूनही प्रकट होते. परिणामी, 'ज्ञानेश्वरी' प्रमाणेच 'अमृतानुभव' हा काव्यग्रंथही तत्समान प्रकृतीच्या काव्यग्रंथाचा वाङ्•मयीन अभ्यास करण्यास आधारभूत ठरतो. असा अभ्यास करू जाता अन्य काव्यग्रंथांच्या मर्यादा लक्षात आल्याशिवाय राहत नाहीत.

**३. स्फूट अभंग वाङ•मयाची परंपरा :**

संत नामदेव हे मराठीतील आद्य अभंगकार होत. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या अस्तित्वाचे भान देणाऱ्या काव्य परंपरेचा अभंगवाङ्•मय कणाच ठरतो. समग्र मराठी साहित्याचे श्रेष्ठ संचित ठरलेली संतकाव्यपरंपरा प्रवाहित करण्याचे फार मोठे श्रेय मराठी अभंगकाव्याला आहे. भगवद्गगीतेसारखा अमृताच्या पुष्ट नदीला प्राकृत मराठी भाषेचा प्रचंड बांध घालून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी यादवकाळात ब्रह्मविद्येचा अपार संचय केला. मध्ययुगीन महाराष्ट्रात गोरा कुंभार, सेना न्हावी, दासी जनी, चोखा महार, कान्होपात्रा, नरहरी सोनार, सावता माळी इत्यादी संतांनी अभंगरचनेने अवधी महाराष्ट्र भूमी दुमदुमून टाकल्याचे अपूर्व व नेत्रदीपक दृश्य दिसू लागते आणि ह्या परंपरेचे वैभव, अर्थ, रहस्य व मूल्य लक्षात येते. ह्या अभंगपरंपरेने समग्र मराठी साहित्यात जी उंची गाठली, जी विशुद्धता प्रकट केली, जी आशयसंपन्नता व्यक्त केली, जे सामाजिक भान प्रकट केले, जीवनाचे जे उन्नयन गाठले, परस्परांच्या देवघेवीतून जे प्रवाहीरूप धारण केले, ते खरोखरच स्तिमित करून टाकणारे आहे.

मराठीतील अभंग वाङ्•मय म्हणजे मध्ययुगीन उत्कट भावकाव्याचा एक मौलिक साठाच वाटू लागतो. स्फुटत्व, उत्कटता, भावानुभवांची आंतरिक लय, तालबद्धता, प्रतिमांकितता, प्रतीकरूपता, तरलता, संवेदनशीलता, आत्माविष्काराची प्रबळता इत्यादी आधुनिक भावकवितेचे म्हणून ओळखले जाणारे सर्व प्रकृतीविशेष संतांनी निर्मिलेल्या अभंगातून प्रकट होतात. त्यामुळे आधुनिक काव्यसमिक्षकाला ह्या अभंगरचनांचा निखळ वाङ•मयीन दृष्टिकोनातून अभ्यास करणे सुकर वाटते. संतसाहित्याच्या निकोप वाङ्•मयीन दृष्टीकोणास सर्वाधिक अनुकूल असा प्राचीन संत साहित्यातील काव्यप्रकार कोणता असेल, तर तो 'अभंगकाव्य' हाच होय.

**४. चरित्र व आत्मचरित्रपर काव्य :**

संतसाहित्यातील चरित्रपर व आत्मचरित्रपर काव्य समृद्ध आहे. संतांना त्यांच्या अध्यात्मसाधनेत मार्गदर्शन करणाऱ्या पूर्वकालीन व समकालीन संतांच्या चरित्रांचा शोध घेण्याची व ह्या चरित्रांनी भारावून जाऊन ती शब्दबद्ध करण्याची प्रेरणा होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. अशाच उत्कट प्रेरणेतून संत नामदेवांनी ज्ञानेश्वरचरित्र तर अभंगबद्ध केलेच. शिवाय समकालीन असणाऱ्या गोरा कुंभार, जनाबाई, चोखामेळा, सावता माळी, जगमित्र नागा आदी संतांची स्फुट चरित्रेही अभंगबद्ध केली आणि हे सर्व त्यांनी स्वयंप्रेरणेने केले.

मध्ययुगीन संतसाहित्यातील चरित्रवाङ्•मय हे विविधतेने नटलेले दिसते. त्यात अभंगबद्ध चरित्रे, ओवीबद्ध चरित्रे काव्यात्मक आहेत. तशीच ती गद्यात्मकही आहेत.

जी गोष्ट चरित्रकाव्यसंबंधीची तीच आत्मचरित्रपर काव्याची होय. चरित्रकाव्याच्या तुलनेने आत्मचरित्रपर काव्य संख्येने कमी भरते. तेही प्रासंगिक स्वरूपात असल्याने संतांची आत्मकथने अपुरी, त्रुटीत व स्फूट वाटतात. संत नामदेव, संत तुकाराम, संत बहिणाबाई ह्या संतकवींनी प्रासंगिक स्वरूपात रचलेली आत्मचरित्रपर काव्य यादृष्टीने लक्षणीय ठरतात. यास अपवाद ज्ञानेश्वरादी भावंडाचा मानावा लागेल. त्यांनी आपली लौकिक जीवने कटाक्षाने अप्रकाशित ठेवल्याचेच त्यांच्या साहित्यनिर्मितीत जाणवते.

नामदेवांचे आत्मकथन त्यांच्या वाणीचे सर्व विशेष घेऊन प्रकटते. संत तुकारामांचे आत्मचरित्रपर अभंग मात्र त्यांची स्वजीवनाकडे पाहण्याची वास्तवलक्षी दृष्टी व निकोप प्रांजळ वृत्ती प्रकट करतात, तर तुकारामांची शिष्या संत बहिणाबाई आपल्या जीवनातील एक वैशिष्ट्यपूर्ण कालखंड स्वच्छपणे आपणांपुढे मांडून जाते. सारांश, संतांना आत्मचरित्रपर काही बोलणे मुळातच फारसे रुचत नाही. त्यातही काही निमित्त घडले, तर ते प्रासंगिक आत्मकथन करू पाहतात. पण ही प्रेरणा फार काळ टिकत नाही. त्यामुळे संतसाहित्यात आत्मचरित्रपर निवेदन तुलनेने अल्प ठरते.

**५. आख्यान काव्य :**

मध्ययुगीन मराठी साहित्यातील आख्यानकाव्याचे दालन समृद्ध असले तरी मराठी संतसाहित्यात आख्यानकाव्ये मोजकीच आढळतात. संत नामदेव, संत जनाबाई वा महानुभाव चक्रधरशिष्य महदंबा यांच्या कथाकाव्यनिर्मितीने मराठी आख्यान - काव्यास प्रारंभ होत असला तरी आख्यात काव्यनिर्मितीचे सूत्र पंडित कवींनीच हाती घेऊन ह्या काव्यप्रकाराची जडणघडण केली आहे. पंडित कवींनी रचलेल्या विदग्ध आख्यान काव्यपरंपरेहून संतांनी रचलेली निखळ मराठी आख्यानकाव्ये प्रेरणा, प्रकृतीविशेष, निर्मितीप्रक्रिया, आविष्कार पद्धती, भाषामाध्यम, छंदविशेष इत्यादीमुळे खचित पृथगात्मक ठरतात. त्यांच्या सिद्धीसाठी संत कवींनी लोकप्रसिद्ध श्रीकृष्णचरित्र कथा, श्रीकृष्णभक्त कथा निवडलेल्या दिसतात. ह्या कथांतील मध्यवर्ती घटना, प्रसंगनिर्मिती यांचा, आविष्कारपद्धतीचा, रूपसिद्धीचा तसेच पृथगात्मकतेचा शोध घेणे म्हणजेच संतनिर्मित आख्यानकाव्याच्या वाड्•मयीन दृष्टिकोनातून अभ्यास करणे होय.

प्रारंभीच एका वैशिष्ट्याचा उल्लेख करणे योग्य ठरेल. ते म्हणजे मराठी संतांनी रचलेली कथाकाव्ये मूलतः उस्फुर्त आहेत. त्यांच्या दृष्टीसमोर असलेच तर भागवतपुराण असेल. पंडितांनी रचलेल्या आख्यानकाव्याच्या तुलनेने संतांनी रचलेली आख्यानकाव्ये वाड्•मयीनदृष्ट्या अभ्यासता येतील. पंडितांची आख्यानकाव्ये ही संस्कृत आख्यानकाव्यांच्या जाणीवपूर्वक अनुकरणातून केलेल्या रचना आहेत. तर संतांची आख्यानकाव्ये ही भक्तीच्या उत्कट प्रेरणेतून उस्फूर्तपणे प्रकटलेली निर्मिती आहे. संतांनी ही आख्यानकाव्य ईश्वरभक्ती व भक्त यांच्या माहात्म्यगायनाची तसेच प्रचाराची माध्यमे म्हणून स्वीकारलली, तर पंडिती कवींनी त्यास आपले पांडित्य, बहुश्रुतता व संस्कृतसाहित्याचा व्यासंग यांच्या प्रदर्शनाची साधने केली. त्यामुळेच प्रेरणा, प्रकृती, निर्मितीप्रक्रिया, आकृतीबंध, भाषा, निवेदनपद्धती, व्यक्तीचित्रनिर्मिती, प्रसंगनिर्मिती इत्यादी बाबतीत संतांची आख्यानकाव्ये पंडिती आख्यानकाव्याहून वेगळी ठरते.

**६. संतांची गीतकाव्य :**

मराठी संतांची गीतरचना ही प्रामुख्याने अभंगाश्रयी आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकारामादी संतांचा एखादा भावोत्कट अभंग बघताबघता गीतरूप धारण करताना दिसतो. त्यामुळेच भावमधुर अभंगरचना वा गीतरचना ह्यांमधील सीमारेषा अनेकदा धूसर होऊन हा अभंग की गीत असा संभ्रम अभ्यासकांना पडल्याशिवाय राहत नाही. ओवीप्रमाणेच अभंग हाही मूलतः एक छंद असल्याने त्याला त्याची म्हणून एक स्थूल, लवचिक अशी लयबद्धता, तालबद्धता व त्यामुळे गेयताही लाभली आहे. यादवकाळातच अभंगाचे रचनाप्रकार व काव्यप्रकार अशी दोन्ही रूपे प्रकर्षाने प्रकटली. नामदेवांनी अभंगास जसे भावकवितारूप दिले तसेच त्यास माहात्म्यगायन, कथाकथन, चरित्रकथन, आत्मकथन, तीर्थाटनवृत्तांतनिवेदन इत्यादी कथननिवेदनाचे प्रभावी साधन म्हणूनही योजले. असे असले तरी ज्ञानेश्वर, एकनाथ व तुकाराम ह्या संतांनी मात्र अभंगाचे उत्कट भावात्म स्फुट रूपच सामान्यतः जतन केले. त्यामुळेच अभंगाचे अनुभवविश्व निश्चित होण्यास मदत झाली.

'मोगरा फुलला', 'घनु वाजे घुणघुणा', 'नको देवराया अंत आता पाहू', 'तू माझी माऊली', 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी', ह्यांसारखे अभंग म्हणजे मूलतः विशुद्ध गीतकाव्येच आहेत. ह्यांत मूलभूत उत्कट भावानुभवाला व त्याच्या प्रतिमांकित आविष्काराला महत्त्व लाभते.

संतसाहित्यातील पदे ही उघड - उघड गेयतेकडे झुकलेली दिसतात. नारदीय कीर्तनाच्या आश्रयाने अशी पदे संतसाहित्यात प्रतिष्ठा पावली व समृद्धही झाली. संत ज्ञानेश्वरांनी केलेल्या रूपकात्म रचना एकाचवेळी आध्यात्मिक आशय व लौकिक अभिव्यक्ती यांचा एक मनोज्ञ संगम ठरते. संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांनीही स्वप्रकृतीनुसार रूपकरचना करून मराठी कवितेचे हे दालन समृद्ध केले. एकनाथांच्या कथनपर, नाट्यलक्षी, उपदेशप्रिय प्रतिभेला हा काव्यप्रकार एवढा मानवला की, त्यांनी त्यास जनसामान्यांच्या व्यवसायांच्या परिभाषांतच अभिव्यक्त करून, त्यातील नाट्य अधोरेखित करून, त्यास मनोभूमिकेबरोबरच स्थूल भूमिकेलाही उठाव देऊन लोकशिक्षण, लोकरंजन व लोकोध्दाराचे एक प्रभावी साधनच करून टाकले.

**संदर्भ :**

१. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे डॉ. सुहासिनी इर्लेकर साहित्य संवाद

२. प्रतिमा प्रकाशन, पुणे र. बा. मंचरकर धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्•मय

३. दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., पुणे डॉ. यु. म. पठाण संतसाहित्य : नवचिंतन

४. अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर डॉ. शोभा गायकवाड संत तुकाराम व्यक्ती व वाङ्•मय

५. अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर प्रा.प्रभाकर पा. पाठक संत नामदेवाची वाणी अमृताची खाणी

'